# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(दुपार)**

---

**दिनांक ३०.०८.२०२६ रविवार**

**नागपूर पोलीस आयुक्तालय तर्फे आयोजीत ''एक घंटा मैदान मे'' आणि ''संडेज ऑन सायकल'' कार्यक्रम संपन्न :-**

महान हॉकी खेळाडू मेजर ध्यानचंद यांचे जयंतीनिमीत्त २९ ऑगस्ट हा दिवस 'राष्ट्रीय क्रिडा दिवस' म्हणून साजरा करण्यात येतो. त्या अनुषंगाने खेलो इंडीया प्राधिकरण यांचेकडून दिनांक २८ ते ३० ऑगस्ट २०२६ या कालावधीत ''एक घंटा मैदान मे'' आणि ''संडेज ऑन सायकल'' या कार्यक्रमाचे आयोजन करण्याबाबत सुचित करण्यात आले होते.

मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर, यांचे प्रमुख उपस्थितीत दिनांक ३०/०८/२०२६ रोजी सकाळी ०६.३० वा. पोलीस मुख्यालय येथील कवायत मैदानावर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी सर्व उपस्थित पोलीस अधिकारी, अंमलदार व त्यांचे कुटुंबिय यांना संबोधीत करतांना शरीर व मनाची स्वच्छता करणे गरजेचे आहे. म्हणून प्रत्येकाने दररोज ४५ मिनीटे वर्कआऊट व १५ मिनीटे योगा वा योगासने करण्याचा सल्ला दिला. व्यायामामुळे आपण शारीरीकदृष्टया तंदुरुस्त राहून आनंदाने जीवन जगु शकतो व प्रत्येकाने संतुलीत आहार घेण्याचा सल्ला देऊन आपआपले कुटुंबियांना सुध्दा व्यायामाकरीता प्रेरीत करावे असे आवाहन केले. मा. पोलीस आयुक्त नागपूर शहर, सहपोलीस आयुक्त व अपर पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी याप्रसंगी आयोजीत सायक्लोथॉन रॅलीस हिरवी झेंडी दाखवुन सुरूवात केली. सायक्लोथॉन रॅलीचा सुरवात पोलीस मुख्यालय येथून होऊन जुना काटोल नाका, पोलीस तलाव टी पॉईन्ट, अवस्थीनगर चौक, पागलखाना चौक, जुना काटोल नाका व परत पोलीस मुख्यालय येथे समाप्त झाली. याप्रसंगी मा. पोलीस आयुक्त यांनी नवप्रविष्ठ पोलीस अंमलदार यांचेसोबत ३ किलोमीटर रनिंग पुर्ण केले. तसेच सर्व अधिकारी व अंमलदार यांचेसोबत योगासने व वर्कआऊट करुन उपस्थितांचे मनोबल वाढवून शारीरीकदृष्टया तंदुरुस्त राहण्याचा संदेश दिला.

कार्यक्रमास मा. मा. श्री विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, श्री नविनचंद्र रेड्डी, सहपोलीस आयुक्त, मा. श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रभाग, श्रीमती विनिता शाहु, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रभाग नागपूर शहर, पोलीस उपायुक्त मा. श्रीमती रश्मिता राव, श्री दीपक अग्रवाल, श्रीमती अन्नपुर्णा सिंग, श्री संदीप पखाले, श्री राहुल माकणीकर, श्री रमेश धुमाळ तसेच पोलीस अधिकारी व अंमलदार, त्यांचे कुटुंबिय मोठया संख्येने हजर होते.









## २) नागपूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत पदोन्नती समारंभ संपन्न :

दिनांक २८.०८.२०२६ रोजी १५.०० वा. पोलीस भवन येथील ऑडोटोरीयम येथे नागपूर शहर पोलीस दलातील पदोन्नती झालेले १२ सहायक पोलीस उपनिरीक्षक व ०८ पोलीस हवालदार यांचा पदोन्नती समारंभ पार पडला. कार्यक्रमात पदोन्ती प्राप्त पोलीस अंमलदार यांना मा. सह पोलीस आयुक्त श्री नविनचंद्र रेड्डी यांचे हस्ते त्यांना प्रशस्तीपत्र व पुष्प प्रदान करण्यात आले. मा. सहपोलीस आयुक्त यांनी बढती मिळालेल्या सर्व अंमलदारांचे अभिनंदन करुन त्यांची जबाबदारी अधिक वाढल्याचे सांगुन नागपूर शहर पोलीस दलाचा दर्जा उंचावण्यात आपले मोलाचे योगदान राहील याबाबत प्रयत्न करावे असे सांगून त्यांचे पुढील वाटचालीस शुभेच्छा देऊन त्यांचे व त्यांचे कुटुंबियांचे अभिनंदन केले.

याप्रसंगी मा. श्री राहुल माकणीकर, पोलीस उपआयुक्त, मुख्यालय, श्रीमती सुनिता मेश्राम, सहायक पोलीस आयुक्त, मानव संसाधन विभाग, नागपूर शहर व मोठया संख्येने पोलीस अधिकारी, अंमलदार व त्यांचे कुटुंबिय हजर होते.







**(कामगिरी)**

## १) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—

दिनांक २९.०८.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये २२ केसेसमध्ये २२ ईसमावर कारवाई करून एकुण ७२,६९१/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०२ केसेसमध्ये ०५ इसमांवर कारवाई करून एकुण २,९२०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,१६१ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. १,१७,०००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक २९.०८.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक ३०.०८.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०३ ईसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ६ चे विशेष पथकाची कामगिरी : कोळसा चोरी करणारे आरोपींविरुध्द गुन्हा दाखल :**

मा. पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. ६ यांचे विशेष पथक यांनी दिनांक २९.०८.२०२६ रोजी चोरीचे कोळश्याबाबत मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, पोलीस ठाणे नवीन कामठीचे हद्दीमध्ये गादा ते लिहीगाव रोडवरील एका शेतात रेड कारवाई केली असता, तिथे अंदाजे १५ टन चोरीचा कोळसा साठवून ठेवलेला मिळून आला. तिथे हजर इसम नामे १) दानिश अन्सारी वय २८ वर्ष २) अहाद खान वल्द फिरोज खान वय २० वर्ष ३) आशिर खान वल्द फिरोज खान वय २२ वर्ष सर्व रा. इस्माईलपुरा, कामठी यांना त्यांचे ताब्यातील कोळश्याबाबत विचारपुस केली असता, त्यांचेकडे कोणतेही वैध कागदपत्रे नसल्याचे दिसुन आले. आरोपींचे ताब्यातुन नमुद कोळसा कि. ४५,०००/— रु. चा जप्त करण्यात आला. आरोपींविरुध्द पोलीस ठाणे नवीन कामठी येथे कलम ३०३(२) भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरु आहे.

सदरची कारवाई मा. विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग यांच्या मार्गदर्शनात श्री. रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्रं ६ नागपूर शहर यांचे देखरेखीखाली विशेष पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी केली आहे.



**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे एमआयडीसी :— हद्दपार ईसमास घातक शस्त्रासह अटक.**

दिनांक २९.०८.२०२६ चे १९.४० वा. चे सुमारास, एमआयडीसी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, भिमनगर, बारेवार बर्तन दुकानामागील मोकळया मैदानात एक संशयीत इसम दिसल्याने त्याचेजवळ जात असता, तो पोलीसांना पाहून पळू लागल्याने त्यास घेराव टाकुन ताब्यात घेतले व त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव राहुल गौतम राऊत वय २८ वर्षे रा. भिमनगर, वार्ड क्र. ४, एमआयडीसी, नागपूर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे पॅन्टचे आत कंबरेतएक लोखंडी धारदार सत्तुर मिळून आल्याने किंमती २००/—रू. चा जप्त करण्यात आला. आरोपीला पोलीस ठाणे येथे आणुन, त्याचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०७/२०२४, दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत घातक शस्त्रासह दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने,

पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द कलम १४२,१३५ म.पो.का., सहकलम ४,२५ भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे.

**२) पोलीस ठाणे गिट्टीखदान :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ३०.०८.२०२६ चे ०६.०० ते ०६.१५ वा. चे दरम्यान, फिर्यादीचे मोठे वडील नामे कैलास नत्थुराम सौंधिया वय ७४ वर्षे रा. प्लॉट क्र. ८२, अवस्थीनगर, मानकापूर नागपुर हे नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉक करीता जापानी गार्डन चौक ते लोकभवन रियर गेट चौक दरम्यान फॉरेस्ट ऑफीस कंपाऊंडजवळून जात असता, पांढरे रंगाची इनोव्हा कार क्र.एम.एच. ३१ जीडी ००८८ चा चालक नामे तुषार रामरतन काकडे वय ३२ वर्ष रा. प्रशांत नगर, सीआयडी ऑफीसजवळ, मानकापूर, नागपूर याने त्याचे ताब्यातील कार मद्य प्राशन करुन कोणाचे जिवीतास धोका निर्माण होऊ शकतो असे माहित असुनही भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवून फिर्यादीचे मोठे वडीलास मागुन जोरदार धडक मारुन गंभीर जखमी केले. त्यांना गंभीर जखमी अवस्थेत उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी चेतन सतिश सौंधिया वय ४० वर्षे रा. प्लॉट क्र. ८२, अवस्थीनगर, मानकापूर नागपुर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे पोउपनि. राठोड ८२०८१६४२२९ यांनी कार चालक आरोपीविरूध्द कलम १०५,२८१ भा.न्या.सं. सहकलम १८४,१८५ मोवाका अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**